**अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग/नापू-२२**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक – २० डिसेंबर, २०२४.

# <u>सूचना</u>

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई हे राज्य अन्न आयोग येथिल अध्यक्ष-१ आणि सदस्य-५ या सहा पदांसाठी पात्र उमेदवारांकडून विहित नमून्यात अर्ज मागवित आहेत.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ मधील नियम १६ (२) येथील तरतुदीनुसार, राज्य अन्न आयोगामध्ये किमान दोन महिला असतील, मग त्या अध्यक्ष, सदस्य किंवा सदस्य सचिव (जो सह सचिव दर्जापेक्षा कमी नसलेला राज्य शासनाचा अधिकारी असेल) कोणीही असो ; याखेरीज यामध्ये अनुसूचित जातीची - एक आणि अनुसूचित जमातीची - एक व्यक्ती असेल, मग ती व्यक्ती अध्यक्ष, सदस्य किंवा सदस्य सचिव कोणीही असो, अशी तरतूद आहे.

२. **नियुक्तीसाठी पात्रतेचे निकष :-**

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ मधील कलम १६ (३) मध्ये राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष व इतर सदस्य पुढील व्यक्तींमधून नियुक्त करता येतील अशी तरतूद करण्यात आली आहे:-

(क) अन्नसुरक्षा, धोरण तयार करणे आणि कृषि, नागरी पुरवठा, पोषण आहार, आरोग्य किंवा इतर संलग्न क्षेत्र, यामधील प्रशासन या बाबीसंबंधात ज्ञान व अनुभव असणारी अखिल भारतीय सेवेची, केंद्र किंवा राज्याच्या इतर कोणत्याही नागरी सेवेची सदस्य आहे किंवा होती किंवा केंद्र वा राज्याच्या नागरी सेवेत एखादे नागरी पद धारण केलेली आहे;

किंवा

(ख) कृषि, कायदा, मानवी अधिकार, सामाजिक सेवा, व्यवस्थापन, पोषण आहार, आरोग्य, अन्नविषयक धोरण किंवा लोक प्रशासन यामधील विस्तृत ज्ञान व अनुभव असलेली सार्वजनिक क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती;

किंवा

(ग) गरीबांच्या अन्न व पोषण आहाराच्या हक्कांच्या सुधारणांच्या संबंधात ज्या व्यक्तीने आपले काम सिध्द केले आहे, अशी व्यक्ती;

३. उपरोक्त पदांसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांनी वर नमूद दोन्ही पदांसाठी स्वतंत्रपणे अर्ज विहित नमुन्यात भरून ते सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, दुसरा माळा, ॲनेक्स इमारत, मंत्रालय, मुंबई-४०००३२ यांचे कार्यालयात **दि. ३० डिसेंबर, २०२४ पर्यंत** पोहचतील असे नोंदणीकृत पोच देय डाकेने/स्पीड पोस्टद्वारे पाठवावेत व संबंधित लखोट्यावर "-----**(पदाचे नाव) करीता अर्ज**" असे स्पष्ट नमूद करावे. वरील पदासाठी विहित अर्जाचा नमुना www.mahafood.gov.in शासनाच्या या अधिकृत संकेतस्थळावर उपलबध करण्यात आला आहे.

४. अर्ज सादर करण्याचा अंतिम **दि. ३० डिसेंबर, २०२४** असा असून या दिनांकापर्यंत (**संध्याकाळी ०६.१५ वाजेपर्यंत**) कार्यालयीन वेळेत प्राप्त झालेले अर्ज स्विकारण्यात येतील. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या, त्याचप्रमाणे, अपूर्ण व अस्पष्ट अर्जाचा विचार केला जाणार नाही.

५. नियुक्तीसाठी पात्रतेच्या निकषांच्या अनुषंगाने परिच्छेद २ मध्ये नमूद केल्यानुसार अर्जदाराने आपल्या अर्जासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या/प्रमाणपत्रांच्या स्व-साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे.

६. सदर नियुक्ती उमेदवारांच्या अर्जांची छाननी समितीमार्फत छाननी होऊन पात्र उमेदवारांची यादी शासनाकडे अंतिम नियुक्तीसाठी सादर करण्यात येणार असल्याने, नियुक्तीसाठी कोणत्याही उमेदवाराने कोणत्याही प्रकारे शिफारस अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास उमेदवारास अपात्र ठरविले जाईल.

*करिता/-*

**(संतोष गायकवाड)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**सहपत्र-अर्जाचा विहित नमुना**

## अर्जाचा नमुना

## (राज्य अन्न आयोग, मुंबई येथील अध्यक्ष व सदस्य या पदांकरीता अर्ज)

| |
|---|
| **उमेदवाराचा अद्ययावत फोटो** |

१. पदाचे नांव :- ------------------------------------------------------------

२. उमेदवाराचे संपूर्ण नाव व पत्ता :- ------------------------------------------------------------
वडीलांचे / पतीचे नाव ------------------------------------------------------------

३. निवासी पत्ता :-
**कायमचा पत्ता** :- ------------------------------------------------------------
**(मोबाईल क्रमांक व ई-मेल नमूद करावा)** ------------------------------------------------------------
------------------------------------------------------------

**तात्पुरता पत्ता** :- ------------------------------------------------------------
**(मोबाईल क्रमांक व ई-मेल नमूद करावा)** ------------------------------------------------------------
------------------------------------------------------------

४. (अ) जन्मदिनांक :-

(ब) जाहिरातीच्या दिनांकास असलेले वय :-

५. उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी आहे किंवा कसे :-

६. शैक्षणिक पात्रता व अनुभव :-

पदवी :- ------------------------------------------------------------
पदव्युत्तर पदवी :- ------------------------------------------------------------
इतर :- ------------------------------------------------------------

७. जातीचा प्रवर्ग :------------------------------------------------------------

८. यापूर्वीच्या नियुक्तीचा तपशिल, असल्यास :- ------------------------------------------------------------
------------------------------------------------------------

९. भाषेचे ज्ञान :-

| | | |
|---|---|---|
| मराठी | होय | नाही |
| हिंदी | होय | नाही |
| इंग्रजी | होय | नाही |

१०. तुम्हाला कोणत्याही गुन्ह्यासाठी अटक करण्यात आली आहे /
न्यायालयात खटला चालु आहे / फौजदारी खटल्याचा सामना करावा लागला आहे का?
होय असल्यास, त्याचा तपशिल द्या. ----------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------

**घोषणापत्र**

१) मला शासन सेवेतुन सक्तीने सेवानिवृत्त, किंवा बडतर्फ करण्यात आलेले नाही.

२) नैतिक पतनाच्या गुन्ह्यासाठी मला दोषी ठरविण्यात आलेले नाही.

३) मी याद्वारे प्रतिज्ञा करतो की, अर्जातील सर्व तपशील योग्य आहे. सदर माहिती किंवा त्यातील कोणतेही विधान असत्य आढळल्यास माझी संबंधित पदावरील नियुक्ती आपोआप करावी व पुढील कारवाईसाठी मी जबाबदार असेल.

**दिनांक :-**
**ठिकाण :-** **उमेदवाराची सही**

**टिप :-**

१) उमेदवाराने रितसर साक्षांकित केलेल्या प्रशस्तिपत्रे / प्रमाणपत्रे आणि कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती जोडाव्यात.

२) अर्जदाराने त्याचा अलीकडील पासपोर्ट आकाराचा फोटो त्याच्या स्वाक्षरीसह जोडावा.

३) स्वाक्षरी न केलेले अर्ज, उमेदवारांनी योग्यरित्या न भरलेले अर्ज आणि आवश्यक कागदपत्रे संलग्न नसलेले अर्ज नाकारले जातील.